“भीमसेन देठे यांच्या समग्र वाङ्मयाचा साहित्याचा चिकित्सक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अंतर्गत

मानव्य विद्याशाखा अंतर्गत पीएच.डी (मराठी) पदवी करिता सादर केलेला शोधप्रबंध

:: संशोधिका ::

रणविर जयश्री परसराम

(एम.ए.,एम.एड.,एम.फील मराठी)

पीपल्स कॉलेज, नांदेड

:: मार्गदर्शक ::

प्रा. डॉ. एस. एन. विभुते

(एम.ए., सेट, पीएच.डी.मराठी)

मराठी विभाग

यशवंत महाविद्यालय, नांदेड

प्रस्तावनाः

दलितांवर हजारो वर्षापासून निघृण अन्याय होत आला. त्यांना उपेक्षा अपमान, अवहेलना सहन करावी लागली. गुलामीमध्ये डांबून त्यांना सतत तुच्छ लेखले गेले; त्यामुळे दलितपणाचे हे भेदक चित्रण दलित कवितेमधून प्रगटतांना दिसते. दलितांच्या जीवनाचे शोषण आणि त्यांच्या दुःख स्थितीचे तात्वीक मंडण करण्याचा प्रयत्न करणारे कर्म-सिध्दांतासारखे तत्वज्ञान आणि पायदळी तुडवणारी क्रुर समाजव्यवस्था मनोस्मृती सारख्या धर्मग्रंथानी केलेले शोषणाचे नियम या संदर्भात दलित कवितेतून संताप व्यक्त होतांना दिसतो.

दलित कविता ही पारंपारिक कवितेपेक्षा वेगळी आहे. आशयदृष्टया तर ती स्थिती तरी भिन्न आहे. पाने, फुले, कोमल भावना, प्रेम, संगित या नाजूक संवेदना वास्तव नसल्यामुळे बहुतांश दलित कविता त्यांना स्पर्शही करीत नाही. दलित कवितेचा प्रवास तळागाळाच्या लोकांचा प्रवास आहे. या स्वरुपाचे लेखन भीमसेन देठे यांनी दुःख, दैन्य, दारिद्रय, अन्याय, जुलूम अस्पृश्यतेमुळे होणारी उपेक्षा हे सार जीवन त्यांनी कवितेच्या स्वरुपात मांडले आहे. भीमसेन देठे हे दलित समाजातून आले. त्यांनी आयुष्यभर बरेच काही जीवनामध्ये भोगले आहे. सामाजिक बांधिलकी हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. त्यांच्या 'गुरफट' या कवितासंग्रहात अनेक रंग पहावयास मिळतात. ही कविता विद्रोही असली तरी रसिक वाचकांना विचार करायला लावणारी आहे.

भीमसेन देठे यांनी मराठी साहित्यात कथा कादंबऱ्या, नाटके लिहिली. परंतु कविता हा त्यांचा श्वास होता आणि कविता हे त्यांचे जगणे होते. भीमसेन देठे यांच्या कथेतून दलित जीवनाच्या पुरुष आणि स्त्रियांचाच नव्हे तर एकूण जीवनाचा सुध्दा प्रत्ययकारी साक्षात्कार घडतो. त्यांच्या 'दगडी', 'वारस', 'पैसा', 'सत्कार', 'जात' या कथात व्यक्तिप्रमाणे समाजाच्या विविध स्तरांचे अतिशय मनोज्ञ व जिवंत चित्रण आढळते. भीमसेन देठे यांच्या जीवनात वेगवेगळया वळणावर जी माणसं भेटली ती नुसती दलितच नव्हे तर इतर जातीधर्माचीही होती. त्यांची सुखं - दुःखं त्यांच्या स्वतःची झाली. त्यांच्या कथासंग्रहातील सारीच माणसं तुफानातील आहेत. त्या माणसांच्या आयुष्यात तुफान आले परंतु ती माणसं त्या तुफानालाच घाबरत लढत राहिली. भीमसेन देठे यांनी स्वतःच्या

आयुष्यातील वेगवेगळया वळणावरच्या माणसांच्या जीवनाचे चित्रण आपल्या कथा लेखनातून केले आहे.

भीमसेन देठे यांची कथा लेखना इतकेच प्रभावी लेखन कादंबऱ्या व नाटके आहेत. पशु पातळीवर ठेवल्या गेलेल्या समाजातला नवा सांस्कृतिक बदल हाच भीमसेन देठे यांच्या 'इस्फोट' या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. 'इस्फोट' या कादंबरीतही दलित आणि सवर्ण यांच्या जीवनातील विविध स्वरुपीय संबंधाचे दर्शन घडते. त्यातून जुन्यांच्या क्रुरतेचे व नव्या पिढीतील समता धर्माचे व प्रेमाचा अनुभव मिळतो. भीमसेन देठे यांनी आंबेडकरी विचारांचा वारसा अक्षयपणे पुढे नेतांना दिसून येतात. कविता ही त्यांची पहिली अविष्कृती असली तरी कथा, कादंबरी आणि नाटयक्षेत्रात तितक्याच जाणीवपूर्वकतेचे आणि मनःपूर्णकतेने ते परिक्रमा करतांना दिसून येत होते. समाज, साहित्य आणि संस्कृतीच्या विविध अंगांना स्पर्श करतांना भीमसेन देठे स्वभान विसरत नव्हते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना पुनः पुनः सांगितले होते की 'इतरांच्या डोळयांनी स्वतः कडे पाहू नका, स्वतःच्या डोळयांनी स्वतःकडे पाहा', असे विचार डॉ. बाबासाहेबांनी सांगितले आहे. आंबेडकर निष्ठ हेच भीमसेन देठे यांच्या वाङ्मयीन सूत्र आहे. 'होरपळ', 'कृष्णमेध', 'गिऱ्हाण', 'इस्फोट', 'घुसमट' या त्यांच्या सर्व वाङ्मयीन कृती आंबेडकरी वाणाच्या आहेत. 'चक्री'ही कादंबरी याच वाटेने पाऊलखुणा पेरत जाणारी आहे. तसेच त्यांनी 'योध्दा'व 'बांडगुळ' ही नाटके प्रसिध्द झालेली आहेत. अलिकडेच 'डबुल'हे आत्मकथन प्रकाशित झाले आहे.

भीमसेन देठे हे नाव महाराष्ट्राला चांगलेच परिचित झाले आहे. मराठी साहित्यात त्यांनी कवी म्हणून प्रवेश केला. १९७७ साली त्यांच्या 'होरपळ' हा पहिला कविता संग्रह प्रकाशित झाला. तर १९८६ झाली 'कृष्णमेध' हा दुसरा कविता संग्रह प्रकाशित झाला. त्यांच्या अनुभव विश्वाने विविध वाङ्मय प्रकाराची निर्मिती केली आहे. त्यांच्या अनेक कादंबऱ्या, कथासंग्रह, नाटके गाजली आहेत. आतापर्यंत त्यांना महाराष्ट्र शासनाचे तीन पुरस्कार मिळाले आहेत.

अशा प्रकारे भीमसेन देठे यांनी गावकुसाबाहेरील उपेक्षित समाजाचे आयुष्य स्वतःच्या साहित्यातून प्रकट केले आहे.

शेवटी भीमसेन देठे यांच्या जीवनातील यश अपयश शोधतानां जन्म, शिक्षण, परिस्थिती, तारुण्य, प्रेरणा, कर्तृत्व, सामाजिक कार्यकर्ता, प्रतिभावशाली कवी, नाटककार, कादंबरीकार व इतर लेखन व शेवटी झालेली शोकांतिका अशी प्रकरणांची सिमारेषा ठरविली आहे. शेवटच्या परिशिष्टात भीमसेन देठे नातेवाईक, पत्नी, मुलगा, मुलगी, सहवासातील मित्र यांच्या भेटीतील माहिती मुलाखतीत आलेली आहे.

प्रबंधाची कालमर्यादाः

भीमसेन देठे यांच्या अगोदरचा काळ म्हणजे पणजोबा पासून ते त्यांच्या मुलापर्यंत या प्रबंधाची कालमर्यादा आहे. या कालमर्यादेत भीमसेन देठे यांच्या आयुष्यातील चढउतार व त्यांच्या साहित्यात उमटलेले प्रतिबिंब यांचा जोडीने अभ्यास आकारलेला आहे. त्यासाठी एकूण आठ प्रकरणांत प्रबंधाची विभागणी केली आहे.

प्रकरण पहिले : भीमसेन देठे यांचे वैयक्तिक जीवन

या प्रकणामध्ये भीमसेन देठे यांच्या वैयक्तिक जीवनाचा आढावा घेतला आहे. वैयक्ति जीवनाचा आढावा घेतांना पूर्वसुरिंच्या त्यांच्या ग्रंथात दिलेली माहिती प्रत्यक्ष (त्यांच्या गावी मंचर जिल्हा) तेथे जावून मिळवलेली माहिती, भीमसेन देठे यांच्या नातेवाईकांनी दिलेली माहिती तसेच भीमसेन देठे यांची पत्नी रंजना भीमसेन देठे, मुलगा, मुलगी, जावई, नातवंडे यांची मुलाखत आणि त्यांच्या सहवासातील व्यक्तीकडून मिळवलेली माहिती घेवून भीमसेन देठे यांचे वैयक्तिक जीवन रेखाटले आहे.

प्रकरण दुसरे : भीमसेन देठे यांचे वाङ्मयीन जीवन

या प्रकरणात भीमसेन देठे यांनी लिहिलेल्या वाङ्मयाचा आढावा घेतला आहे. भीमसेन देठे यांनी अत्यंत हालाखिच्या परिस्थितीत, गरिबीत दुःख दैन्याशी झुंज घेत आले. भीमसेन देठे एकीकडे ज्येष्ठ दलित कथाकार आणि दुसरीकडे गावकुसाबाहेरील उपेक्षित जीवन आपल्या कवीता आणि कथांमधून समाजापर्यंत पोहचवणारे साहित्यिक म्हणून ओळखले जातात. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना पुनः पुनः सांगितले होते 'इतरांच्या डोळयांनी स्वतः कडे पाहू नका, स्वतःच्या डोळयांनी स्वतःकडे पाहा.'

भीमसेन देठे यांची अंतःप्रेरणा ह्याच वाणाची आहे. प्रखर आंबेडकरनिष्ठा हेच त्यांच्या वाङ्मयाचे सूत्र आहे. 'होरपळ', 'कृष्णमेध', 'गिऱ्हाण', 'इस्फोट', 'घुसमट', 'झाकळ', 'चक्री' या त्यांच्या सर्व वाङ्मयीन कृती आंबेडकरी विचारांच्या आहेत. भीमसेन देठे यांनी आयुष्यभर बरेच काही भोगले आहे. त्यांच्या कवितांमध्ये समाजाचे दुःख, दैन्य, दारिद्रय, अन्याय, जुलूम अस्पृश्यतेमुळे होणारी उपेक्षा हे सारे त्यांच्या कवितांमध्ये दिसून येते. सामाजिक बांधिलकी हे त्यांच्या कवितेचा स्थायी भाव आहे. भीमसेन देठे यांनी कथा, कादंबरी, नाटके लिहिली परंतु कविता हा त्यांचा श्वास आहे. कविता हे त्यांचे जगणे आहे. त्यांच्या कथामधून दलित जीवनाच्या पुरुष आणि स्त्रियांचाच नव्हे तर एकूण जीवनाचा सुध्दा साक्षात्कार घडतो. त्यांच्या कथांमधून व्यक्तिप्रमाणेच समाजातील विविध स्तरांचे जीवन चित्रण दिसून येते. तसेच त्यांच्या कादंबरीमधून दलित आणि सवर्ण यांच्या जीवनातील विविध स्वरुपीय संबंधाचे दर्शन घडते. त्यातून जून्या पिढीच्या क्रुरतेची व नव्या पिढीतील समता धर्माचे व प्रेमाचे अनुभव दिसून येतात. त्यांना जीवनात वेगवेगळी माणसे भेटली ती नुसती दलितच नव्हे तर इतर जातीधर्माचीही होती. त्यांची सुख दुःख ही त्यांच्या जीवननिष्ठेशी संवाद साधणारी आहे. भीमसेन देठे यांनी सर्वच वाङ्मयप्रकारात त्यांच्या नवनवोन्मेष प्रतिभेने मराठी साहिल्याला समृध्द केले. त्यांना मौल्यवान अलंकरणे देण्याचा दलित साहित्यिकांत भीमसेन देठे एक ज्येष्ठ साहित्यिक म्हणून ओळखले जातात. हा इतिहास या प्रकरणामध्ये रेखाटला आहे.

प्रकरण तिसरे : भीमसेन देठे यांची कविता

या प्रकरणात कविता वाङ्मयाचा इतिहास सांगण्यापेक्षा भीमसेन देठे यांनी गावकुस बाहेरील उपेक्षित समाजाचे आयुष्य जगासमोर मांडले म्हणून ते ज्येष्ठ साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी आयुष्यभर बरेच काही भोगले आहे. समाजाचे दुःख, दैन्य, दारिद्रय, अन्याय, जुलूम, अस्पृश्यतेमुळे होणारी उपेक्षा हे सार त्यांच्या कवितांनमधून दिसून येते. सामाजिक बांधिलकी हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. गुरफट या कविता संग्रहामध्ये अनेक कविता विद्रोही असल्यातरी ती रसिक वाचकांना विचार करायला लावणारी आहे. त्यांनी मराठी साहित्यात कथा, कादंबऱ्या, नाटके लिहिली. परंतु कविता हा त्यांचा श्वास आहे. त्यांच्या अनुभवातील जीवन त्यांच्या (स्वतःच्या) कवितांमधून दिसून येते. कोणकोणत्या बाबतीत त्यांची कविता समकालीनाच्या बाबतीत वेगळेपणाचे साम्याचे दर्शन घडविते. ते त्यांच्या कवितेतील आशय सूत्रावरुन अभ्यासले आहे. या सारखेच दलित कवि आणि भीमसेन देठे यांच्या कवितेचे नाते आहे. परंतु दलित कवितेतील काही तुरळक गोष्टीचे भीमसेन देठे यांच्या कवितेशी साम्य वगळता, अनेक बाबतीत भीमसेन देठे यांची कविता कशी वेगळी वाटते हा आशय या प्रकरणात अभ्यासला आहे आणि शेवटी त्यांच्या कविता वाङ्मयाचे वेगळेपण सांगून वैशिष्टये सांगितले आहे.

प्रकरण चौथे : भीमसेन देठे यांची कथा, नाटक, कादंबरी व आत्मकथन

या प्रकरणात भीमसेन देठे यांच्या इस्फोट, चक्री, झाकळ, घुसमट या कादंबऱ्या गिऱ्हाण, रिल्डस, तुफानातील दिवे व इंगा हे कथासंग्रह व योध्दा, बांडगुळ ही नाटके, डबुलं हे आत्मकथन यांचा विचार केला आहे. इस्फोट, चक्री, झाकूळ आणि घुसमट या कादंबऱ्यामध्ये आंबेडकरी विचार पशुपातळीवरील समाजातील जीवन यावर आधारित आहेत. स्वतःची गंभीर वाङ्मयीन भूमिका घेऊन देशात घडलेल्या अनेक घटना, विशेषतः आंबेडकरी चळवळीतील अनेक चढउतार त्यांच्या कादंबऱ्या लेखनातून दिसून येतात. भीमसेन देठेंच्या कादंबरी लेखनाचे स्वरुप, आशय सुत्रे, जीवनदर्शन आणि भाषाशैली या घटकातून या कादंबऱ्यांची वैशिष्टये सिध्द होतात. त्यामुळे त्यांच्या

कादंबऱ्यांचा विचार या घटकांच्या आधारे केल्यास त्यांची समग्र वैशिष्टये शोधता येतील असा विचार या प्रकरणात केला आहे.

भीमसेन देठे यांच्या कथांतून दलित जीवनाच्या पुरुष आणि स्त्रियांचाच नव्हे तर एकूण जीवनाचा सुध्दा प्रत्यकारी साक्षात्कार घडतो. त्यांच्या दगडी, वारसा, पैसा, सत्कार, जात या कथात व्यक्तिप्रमाणे समाजाच्या विविध स्तरांचे अतिशय मनोज्ञ व जीवंत चित्रण दिसून येते. त्यांच्या कथालेखनातून त्यांची वैशिष्टये सांगितली आहेत. तसेच योध्दा व बांडगुळ या नाटकातील घटना, प्रसंग, व्यक्ती, जीवन संघर्ष, भाषाशैली यांचा विचार करुन त्यांची वैशिष्टये सांगितली आहेत. तसेच भीमसेन देठे यांचे डबूल या आत्मकथनाचा अभ्यास केला गेला आहे शेवटी कथा, कादंबरी, नाटककार म्हणून भीमसेन देठेंनी केलेल्या वैशिष्टयपूर्ण कामगिरीचे महत्व सांगितले आहे.

प्रकरण पाचवे : भीमसेन देठेच्या साहित्यातील व्यक्तिरेखा

भीमसेन देठे यांनी मराठी साहित्यात कथा, कादंबऱ्या, नाटके लिहिली परंतु कविता हा त्यांचा श्वास आहे. कविता हे त्यांचे जगणे आहे. त्यांच्या जीवनातील अनुभव, कथा, कादंबरी, नाटक, कविता यामधून दिसून येते. समाजातील दुःख, दैन्य, दारिद्रय, अन्याय, जुलूम, अस्पृश्यतामुळे होणारी उपेक्षा हे सारं त्यांच्या कवितांमधून दिसून येते.

'गुरफट' या कवितासंग्रहात अनेक रंग पहावयास मिळतात. ही कविता विद्रोही असली तरी रसिक वाचकांना ती अंतर्मुख विचार करायला लावणारी आहे. भीमसेन देठे हे सिध्दहस्त आणि निष्ठाशील लेखक आहेत. झाकुळ ही कादंबरी सत्यावर आधारलेली आहे. त्यांच्या कथांतून दलित जीवनाच्या पुरुष आणि स्त्रियांचाच नव्हे तर एकूण जीवनाचा सुध्दा प्रत्ययकारी साक्षात्कार घडतो. त्यांच्या 'दगडी', 'वारस', 'पैसा', 'सत्कार', 'जात' या कथात व्यक्तिप्रमाणे समाजाच्या विविध स्तरांचे अतिशय मनोज्ञ व जीवंत चित्रण आढळते, त्यांनी गावकुसाबाहेरील उपेक्षित समाजाचे आयुष्य जगासमोर आपल्या साहित्य लेखनातून जगासमोर मांडले. जे अनुभवले, जे भोगले ते त्यांच्या लेखनातून दिसून येते. त्यांच्यावर लहानपणापासून व्यक्तिमत्वाची जडणघडण

झालेली दिसून येते. मंचर या त्यांच्या गावातील 'दगडी' या स्त्रीच व्यक्तिमत्व त्यांच्या मनात खोल रुतलेलं दिसते. पुढे एस.एस.सी. झाल्यानंतर मुंबईला आले. त्यांनी मध्यंतरीच्या काळात देवदासीवर लेख लिहितांना काही वैश्यांची मुलाखत घेतली. त्यांचा जीवनपट ऐकतांना त्यांचं मन हेलावून गेलं. समाजाने त्यांच्यावर लावलेल्या बाजारपणातून त्या सुटका करु इच्छित होत्या; परंतु त्यांना समाज या तुरुंगातून बाहेर पडू देत नव्हता. त्यांना महारोग्यापेक्षाही भयंकर वागणूक दिली जात होती. वर्षानुवर्ष दलित स्त्रियांची अवस्था तर फार कठीण; अगतिक असहाय्य असलेल्या सुंदर दलित स्त्रियांना जगणेही कठीण होते. त्यांनी ५० वर्षातील कालखंडातील अनुभव दगडी या कादंबरीत सांगितले आहे.

विविध स्वभावाच्या व्यक्तिरेखा त्यांच्या साहित्यात आहेत. मराठी साहित्यातील व्यक्तिरेखा पेक्षा त्याच वेगळेपण निश्चितच वेगळं ठरणार आहे. म्हणून काही वैशिष्टयपूर्ण व्यक्तिरेखा गावातील व मुंबई शहरातील वैशिष्टपूर्ण व्यक्तिरेखा यात अभ्यासल्या आहेत.

प्रकरण सहावे : भीमसेन देठे यांच्या साहित्याचे मूल्यमापन

(समकालीन लेखनाशी सुसंगती, विसंगतीस व पुढील लेखकांनी घेतलेले आशय, विषय यांच्या आधारे व वाङ्मयीन गुणाच्या आधारे)

या प्रकरणात भीमसेन देठे यांच्या साहित्याचे मूल्यमापन करतांना समकालीन लेखकांच्या लेखनांच्या आधारे तुलनात्मकदृष्टीने भीमसेन देठे यांचे साहित्य श्रेष्ठत्व प्रधान करते. समकालीन वाङ्मयाचे व भीमसेन देठे यांच्या वाङ्मयातील आशय, विषय, सारखेपण शोधून तुलनात्मक दृष्टीतून भीमसेन देठे यांचे साहित्य श्रेष्ठ ठरते तसेच त्यांच्या साहित्यानंतरच्या साहित्यिकांना त्यांचा अनुभवातून प्रेरणा मिळाली. त्यांना आशय विषय पुरविले. यातून भीमसेन देठे यांच्या श्रेष्ठत्वाचा शोध घेतला आहे. साहित्य मापदंडाच्या आधारे त्यांच्या साहित्योच मूल्यमापन करतांना केवळ चौकटीतील मूल्यमापन करावयाचे झाल्यास मग ती कविता, कथा, कादंबऱ्या, नाटके, आत्मचरित्र यांच्यातील आकृत्तीबंध, आशय, विषय, कथाभाग, प्रसंगनिर्मिती, घटना, वातावरण निर्मिती,

व्यक्तीचित्रणे, भाषाशैली, समाजाचे दु:ख, दैन्य, दारिद्रय, अन्याय, जुलूम, अस्पृश्यतेमुळे होणारी उपेक्षा यांचाही तुलनात्मक अभ्यास करुन भीमसेन देठे यांच्या साहित्याचे मुल्यमापन केले आहे. त्याचे वेगळेपण तपासले आणि त्यांचे श्रेष्ठत्व सांगितले आहे.

प्रकरण सातवे : भीमसेन देठे यांचा जीवन संघर्ष

या प्रकरणात एकूणच भीमसेन देठेंचा जीवनाचा आढावा घेतला आहे. परिस्थितीला तोंड देत भीमसेन देठेंचा जीवनसंघर्ष महत्वाचा ठरला आहे. अतिशय बिकट परिस्थितीत आयुष्यभर त्यांनी बरेच काही भोगले आहे. समाजाचे दु:ख, दैन्य, दारिद्रय, अन्याय, जुलूम अस्पृश्यतेमुळे होणारी उपेक्षा आणि गावकुसाबाहेरील उपेक्षित समाजाने आयुष्य जगासमोर आणणारे ज्येष्ठ साहित्यिक म्हणून ओळखले जातात. हेच त्यांच्या जीवनातील फार मेठे यश आहे. या प्रकरणात जन्म, बालपण, प्रौढपण, शिक्षण, तारुण्य, कौटुंबिक, कवी, कादंबरीकार, नाटककार, साहित्य, कार्यकर्ता या सर्व अंगांचा विचार करुन त्यांचे यशापशय सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरण आठवे : समारोप

शेवटी आठव्या प्रकरणात भीमसेन देठे यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास व्यक्ती आणि वाङ्मय या विषयाचा समारोप करतांना काही ठळक बाबींचा निष्कर्ष काढून तो रसिक वाचकांच्या अभ्यासकांच्या हाती यावा म्हणून दिला आहे.